


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २८४ वा मंगळवार दि २७ जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शिंदेसेना मागे, ठाकरेसेना आगे; महापालिका समित्यांवर भाजप-उबाठाचा वरचष्मा, मनसे आणि एमआयएम ही...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महापालिका निवडणुकीतील निकालानंतर महापालिकेतील विविध महत्त्वाच्या समित्यांवर शिवसेनेपेक्षा भाजप-शिवसेना (उबाठा) पक्षाची सदस्य संख्या जास्त असून त्यांचेच वर्चस्व राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिकेतील १८ पैकी नऊ प्रभाग समित्यांत भाजपचे नगरसेवक जास्त असल्याने त्यावर भाजपचे वर्चस्व आहे. तर एका प्रभाग समितीत भाजप आणि काँग्रेस नगरसेवक संख्या समसमान आहे. शिवसेना आणि एमआयएमने प्रत्येकी एकाच प्रभाग समितीवर वर्चस्व सिद्ध केले आहे. एम पूर्व प्रभाग समितीत एमआयएमचे नगरसेवक आणि कुर्ला एल वॉर्डमध्ये शिवसेनेचे नगरसेवक जास्त असल्याने या प्रभाग समितीच्या चाव्या त्यांच्या हातात आहेत. शिवसेनेचे २९ नगरसेवक असूनही केवळ एकाच प्रभाग समितीत त्यांची आघाडी राहणार आहे. या महापालिका निवडणुकीत एमआयएमचे आठ नगरसेवक निवडून आले आहेत. कोटा आणि निश्चित केलेल्या सूत्रानुसार स्थायी, सुधारसह अन्य समित्यांवर भाजपचे आणि त्यानंतर शिवसेना (उबाठा) पक्षाचे वर्चस्व आहे. मात्र १८ प्रभाग समित्यांपैकी (२५ वॉर्डच्या मिळून) नऊ प्रभाग समित्यांमध्ये भाजपचे जास्त नगरसेवक निवडून आल्याने या समित्याही त्यांच्याच हातात आहेत. याव्यतिरिक्त ए, बी आणि ई प्रभाग समितीत भाजप आणि काँग्रेसचे प्रत्येकी चार नगरसेवक असून त्याखालोखाल अन्य पक्षाचे नगरसेवक आहेत. उर्वरित समित्यांपैकी पाच समित्यांवर शिवसेना (उबाठा) पक्षाची आघाडी असून यामध्ये एफ दक्षिण आणि एफ उत्तर प्रभाग समिती, जी दक्षिण प्रभाग समिती, जी उत्तर प्रभाग समिती, एच पूर्व आणि एच पश्चिम प्रभाग समिती तसेच के उत्तर प्रभाग समितीचा समावेश आहे. त्यांच्या नगरसेवकांची संख्या जास्त आहे. तर अन्य पक्षाचे नगरसेवक कमी असून त्यांचे प्रभाग समिती सदस्य कमी असतील. शिवसेनेच्या कुर्ला एल वॉर्ड प्रभाग समितीतील सदस्य संख्या ही पाच असून त्या खालोखाल उबाठाचे चार, भाजपचे दोन, काँग्रेसचे



तीन, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) दोन नगरसेवक या प्रभाग समितीचे सदस्य असतील. एमआयएमचे एम पूर्व वॉर्डमध्ये आठ नगरसेवक निवडून आले असून त्यांचे या प्रभाग समितीत सदस्य संख्या जास्त असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. तर शिवसेनेचे चार, भाजपचे दोन आणि उबाठाचे दोन नगरसेवक इथून निवडून आले आहेत. १८ प्रभागांपैकी या दोन प्रभागात शिवसेना, एमआयएम आघाडीवर आहे. मनसेचे मुंबईतून सहा नगरसेवक निवडून आले असून एफ दक्षिण आणि एफ उत्तर, जी उत्तर, के उत्तर, पी पूर्व आणि पश्चिम, एस आणि टी प्रभाग समिती (मुलुंड) तर एन प्रभाग समितीवर प्रत्येकी एक नगरसेवक असेल. समाजवादी पक्षाचे दोन सदस्य प्रभाग समितीत असतील.

# १२५ रुपयांत २६ पदार्थांचा फसवा जाळा! शिवगड लॉन्सवर हजारो ग्राहकांची उघड उघड फसवणूक...

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरात प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने १२५ रुपयांत २६ खाद्यपदार्थ या भव्य आणि आकर्षक ऑफरच्या नावाखाली नागरिकांची सरळसरळ फसवणूक झाल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. शिवगड लॉन्स व्यवस्थापनाने केलेल्या या फसव्या जाहिरातीमुळे हजारो कुटुंबांनी विश्वास ठेवून बुकिंग केले; मात्र प्रत्यक्षात या ऑफरचा जमिनीवर काहीही संबंध नसल्याचे चित्र समोर आले आहे. सोशल मीडिया, बॅनर्स आणि मोठमोठ्या जाहिरातींमधून “स्वस्तात मेजवानी” चे आमिष दाखवून नागरिकांना लॉन्सकडे खेचण्यात आले. प्रजासत्ताक दिनी शिवगड लॉन्स परिसरात प्रचंड गर्दी उसळली. पण आत प्रवेश करताच ग्राहकांचा हिरमोड झाला. जाहिरातीत सांगितलेले अनेक पदार्थ उपलब्धच नव्हते, तर जे थोडेफार होते तेही अत्यंत निकृष्ट दर्जाचे आणि अपुऱ्या प्रमाणात देण्यात आले. अव्यवस्था, लांबलचक रांगा, गोंधळ आणि अराजकतेमुळे महिलांपासून वृद्धांपर्यंत आणि लहान मुलांपर्यंत सर्वांनाच प्रचंड त्रास सहन करावा लागला. काही वेळातच संतप्त नागरिकांचा उद्रेक झाला. “ही ऑफर नव्हे, तर उघड फसवणूक आहे,” असा आरोप करत ग्राहकांनी व्यवस्थापनाला जाब विचारला. पैसे परत देण्याची मागणी होताच शिवगड लॉन्स व्यवस्थापनाने बोटचेपी भूमिका घेतली. कोणतेही स्पष्ट उत्तर न देता वेळकाढूपणा केल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले. नागरिकांनी हा प्रकार जाणीवपूर्वक दिशाभूल करणारा आणि ग्राहकांच्या विश्वासाशी खेळ करणारा असल्याचा आरोप केला आहे. या गंभीर प्रकरणात आता प्रशासन आणि ग्राहक संरक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून शिवगड लॉन्स व्यवस्थापनावर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा अशा




फसव्या ऑफरच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांची लूट सुरूच राहणार का, असा थेट सवाल बुलढाण्यातून उपस्थित केला जात आहे.

# कायद्याच्या हातांपलीकडचे!



परस्परांवर केलेले विखारी हल्ले, घाऊक पक्षांतरे-बंडखोऱ्या आणि तत्त्वशून्य आघाड्या अशा सगळ्या महिन्याभराच्या गदारोळानंतर, अखेर राज्यातील महापालिकांच्या निवडणुकांसाठी मतदानाचा दिवस उजाडला आहे. या मतदानात कोण निवडून येईल, कोण पराभूत होईल, याची उत्सुकता आहेच; पण या निमित्ताने गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेल्या प्रशासक, तथा नोकरशहांच्या राजवटीची अखेर होऊन मुंबईपासून नागपूरपर्यंत राज्यभरातील महापालिकांत लोकप्रतिनिधींची राजवट सुरू होईल, हे महत्त्वाचे. देशाचे आणि राज्याचे कारभारी निवडण्यापेक्षा नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांशी जोडलेल्या या स्थानिक निवडणुका अधिक जिव्हाळ्याच्या ठरतात आणि तेवढ्याच हिरीरीने लढल्याही जातात. मुळात प्रारंभी करोना साथरोगाचा काळ आणि नंतर इतर मागासवर्गीयांसाठीचे (ओबीसी) आरक्षण अशा विविध कारणांमुळे निवडणुका लांबत गेल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्येक निवडणुकीत नेतृत्वाची एक पिढी घडत असते. या वेळी निवडणुका लांबल्याने ही नेतृत्वघडण थांबली होती. त्यामुळेच इतक्या प्रतीक्षेनंतर सुरू झालेला लोकशाहीचा येळकोट गाजणे अपेक्षित होते आणि तसा तो गाजलाही. सत्ताधारी महायुतीने गरज असेल, तेथे एकत्र आणि नसेल, तेथे स्वतंत्र; अशा व्यावहारिक सूत्राने निवडणुका लढवल्या. भारतीय जनता पक्षाने मुंबईत शिवसेनेशी (एकनाथ शिंदे) युती केली, तर पुण्यात शिंदे आणि अजित पवार यांच्या विरोधात आणि अन्य शहरांतही स्वतंत्र धोरण अशा प्रकारे मतदारांना साद घातली. या खेळीतून विरोधकांचीही जागा भरून काढण्याचा प्रयत्न राज्यातील सत्ताधारी युतीने केला. मात्र, पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार यांनी त्यातही उपखेळ्या करून निवडणूक रंगतदार बनवली. राज्यात सर्वत्रच अनेक नेत्यांची बेताल विधाने यंदा चर्चेत आली; तसेच भाजप-काँग्रेस किंवा भाजप-एमआयएम अशा आघाड्यांमुळे या पक्षांच्या जुन्या मतदारांनाही धन्य वाटले! मात्र, सर्वांत लक्षवेधी ठरला, तो पक्षोपक्षींच्या जोडसाखळीचा ङ्गअंबरनाथ पॅटर्नफ. सत्तेसाठी इरेला पेटलेले प्रस्थापित आणि त्यांच्या वळचणीला जाण्यासाठी आतुरलेले विरोधी पक्ष यांनी लोकलज्जा खुंटीवर टांगून सत्तेच्या गंगेत हात धुऊन घेतले. यंदा घाऊक संख्येने वेगवेगळ्या शहरांत तब्बल ६८ जण बिनविरोध आले. यामागच्या सत्तेच्या गैरवापराचा आरोप बाजूला ठेवला, तरी निवडणूकच होऊ न देण्याची बाब लोकशाहीची बूज राखणाऱ्यांना अस्वस्थ करणारी आहे. अशा पद्धतीने मतदारांचा विश्वास धाब्यावर बसवणाऱ्यांना उपलब्ध कायद्यांत कोणतीही शिक्षा नाही, हे दुर्दैवी. राजकीय आघाडीवर पाहिल्यास शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती आणि दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांची आघाडी या दोन महत्त्वपूर्ण घटना ठरल्या. सध्यापुरती तरी ङ्गराजकीय गरजफ हे घटक वरचढ असल्याने राज्यातील राजकीय घुसळणीच्या तार्किक शेवटाकडे जाण्यासाठी हे निमित्त ठरेल का, याचे उत्तर निवडणुकीनंतरच मिळेल, तसे काही घडले, तर देशातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि संयुक्त पुरोगामी आघाडीमध्येसुद्धा फेरजुळणीला प्रारंभ होऊ शकतो. फार मोठी उलथापालथ झाली नाही, तर आता पुढील निवडणुका तीन वर्षांनीच येणार असून, राजकारण बाजूला ठेवून नागरिकांच्या हिताची कामे करण्यास सगळ्यांनाच भरपूर वाव आहे. हे सगळे खेळ पाहिल्यानंतर कोणाच्या मनात ङ्गमतदान तरी का करायचे,फअसे निराशेचे विचार चमकून जाणे गैर नाही; पण वास्तवात पहायला गेले, तर या प्रश्नातच त्याचे उत्तर दडले आहे. ङ्गआपण काहीही केले, तरी मतदार मेंढरांप्रमाणे आपल्या मागे येणार,फअसा दुर्दम्य विश्वास असल्यामुळेच राजकीय पक्ष-नेते त्यांना गृहीत धरत आहेत; निवडणुकीच्या काळात जात-धर्म किंवा नात्यागोत्यासारखे मुद्दे काढून मतदारांना मूळ नागरी प्रश्नांपासून दूर नेत आहेत. या सर्व गोष्टींचा मतदारांनी साकल्याने विचार करायला हवा. आपल्याला हवा तो लोकप्रतिनिधी नेमण्यासाठी त्यांनी मतदान करायला हवे. विद्वेषाचा डांगोरा पिटणारे वाचाळवीर आणि त्यांना खतपाणी घालणाऱ्या समाजमाध्यमांच्या गलबल्यात आपले प्रश्न सोडवणाऱ्या प्रतिनिधींची निवड सोपी नाही हे खरेच; पण ङ्गत्यातल्या त्यातफ चांगला पर्याय निवडणे, हेच लोकशाहीचे वैशिष्ट्य असून, चुकणाऱ्यांना मतपेटीतून धडा शिकवणे आणि दुसरा चुकल्यास पुढे तेच हत्यार वापरणे, ही निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळेच ङ्गसब घोडे बारा टक्केफ म्हणतानाही ङ्गदगडापेक्षा वीट मऊफ हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे आणि आजची राजेपणाची औटघटका सजगपणे मतदान करूनच साजरी केली पाहिजे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ठाकरेंना भिडलेला नेता चर्चेत; मोदी, शहांच्या निकटवर्तीयावर लवकरच मोठी जबाबदारी?

**नवी दिल्ली :** मुंबई महाराष्ट्राची नाही. ते आंतरराष्ट्रीय शहर आहे, असं वादग्रस्त विधान केल्यानं मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या रडारवर आलेले भाजपचे नेते के. अण्णामलाई पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. अण्णामलाई यांनी मुंबईत येऊन मुंबईबद्दल केलेलं विधान वादग्रस्त ठरलं. मनसे प्रमुख राज ठाकरेंनी अण्णामलाई यांचा शिवतीर्थावरील जाहीर सभेतून समाचार घेतला. यानंतर अण्णामलाई यांना राज ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. त्यामुळे अण्णामलाईचं नाव देशभर चर्चेत राहिलं. यानंतर आता अण्णामलाई यांना लवकरच नवीन जबाबदारी मिळण्याची दाट शक्यता आहे.भाजप च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नवीन यांची नियुक्ती झाल्यानंतर पक्षानं पाच राज्यांमध्ये होऊ घातलेल्या





विधानसभा निवडणुकांची तयारी सुरु केली आहे. आसाममधील सरकार टिकवण्याचं आणि पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापन करण्याचं आव्हान भाजप समोर आहे. यासोबतच तामिळनाडू, पुदुचेरीतही निवडणुका होणार आहेत. तमिळनाडूत भाजपनं द्रमुकला बॅकफ ूटवर ढकलण्यासाठी अण्णाद्रमुकच्या नेतृत्त्वात एनडीएचा विस्तार केला आहे. २३ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी तामिळनाडूच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी द्रमुकवर हल्लाबोल केला. याआधी गृहमंत्री अमित शहांनीदेखील द्रमुकला रडारवर घेतलं होतं. भाजप तामिळनाडूतील निवडणुकीसाठी गांभीर्यानं तयारी करत आहे. त्यात अण्णामलाई यांची भूमिका महत्त्वाची असेल.भाजपनं ४५ वर्षीय नितीन नवीन यांना राष्ट्रीय अध्यक्षपदी आणत पक्षाचं नेतृत्व नव्या पिढीकडे सोपवलं आहे. देशभरात तरुणांना पक्षात अधिकाधिक संधी देण्याच्या प्रयत्नात भाजप आहे. त्यामुळे अण्णमलाई यांची वर्णी नितीन नवीन यांच्या टिममध्ये लागण्याची शक्यता वाढली आहे. त्यांच्याकडे म हासचिवपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. भाजपनं अण्णामलाई यांना वरिष्ठ पदी संधी दिल्यास त्याचा फायदा पक्षाला तमिळनाडूत होऊ शकतो, असं राजकीय विश्लेषक सांगतात.अण्णामलाई यांनी याआधी तामिळनाडू भाजपचं प्रदेशाध्यक्षपद सांभाळलं आहे. सध्याच्या घडीला त्यांचं वय ४१ वर्षे आहे. नितीन नवीन यांच्या टिममध्ये त्यांची निवड केली जाऊ शकते. आयपीएस अधिकारी राहिलेले अण्णामलाई नोकरी सोडून राजकारणात आले. ते पंतप्रधान मोदी यांचे जवळचे मानले जातात. अण्णाम लाई यांना लवकरच राष्ट्रीय पातळीवर संघटनेत महत्त्वाचं पद मिळू शकतं, असं उच्चपदस्थ सूत्रं सांगतात. अमित शहांनी अण्णामलाई यांचं कौतुक केलं आहे.

## एकनाथ भाईंनी धोका ओळखला, शिंदेसेनेची 'स्वतंत्र' खेळी

**मुंबई :** मुंबईचा महापौर कोण होणार याबद्दल बरीच चर्चा सुरु असताना महापालिका निवडणुकीत बहुमत मिळवणाऱ्या भाजप आणि शिंदेसेनेच्या नगरसेवकांची गट नोंदणीच अद्याप झाली नसल्याचं स्पष्ट झालं आहे. भाजप आणि शिंदेसेनेचा संयुक्त गट म्हणून कोकण आयुक्तांकडे नोंदणी होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. पण आता असा संयुक्त गट तयार केला जाणार नसल्याची माहिती आहे.संयुक्त गट म्हणून नोंदणी झाल्यास शिंदेसेनेला पुढील ५ वर्षे महापालिकेत भाजपचंच धोरण अवलंबावं लागेल. त्यामुळे महापालिकेत शिंदेसेनेत स्वतंत्र अस्तित्व नष्ट होण्याचा धोका आहे. त्यामुळे शिंदेसेनेकडून त्यांच्या नगरसेवकांच्या गटाची स्वतंत्र नोंदणी केली जाणार असल्याचं सुत्रांची माहिती आहे. मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागून १० दिवस लोटले आहेत. निवडणुकीत भाजप आणि शिंदेसेनेला स्पष्ट



बहुमत मिळालं आहे. भाजपचे ८९, तर शिंदेसेनेचे २९ उमेदवार विजयी झाले आहेत. महायुतीला ११८ जागांवर यश मिळालं आहे. सत्ता स्थापनेसाठी ११४ चा आकडा गरजेचा आहे.निकाल लागून दीड आठवडा होत आला तरीही भाजप, शिंदेसेनेनं अद्याप कोकण आयुक्तांकडे गट नोंदणी केलेली नाही. महापौरपद, उपमहापौर, विविध वैधानिक आणि विशेष समित्या यांचं अध्यक्षपद आणि सदस्यत्व यावर भाजप, शिंदेसेनेच्या नेत्यांमध्ये चर्चा सुरु आहे. सर्वाधिक महत्त्वाच्या स्थायी समितीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची सदस्य संख्या समान येत असल्यानं विरोधकांची संख्या कमी करण्यासंदर्भात अभ्यास सुरु होता. सत्ताधारी आणि विरोधकांचे १३-१३ सदस्य स्थायी समितीवर सदस्य म्हणून जातील.भाजप आणि शिंदेसेनेच्या नगरसेवकांनी संयुक्त कोकण आयुक्तांकडे नोंदणी केल्यास सत्ताधारी पक्षाचा एक सदस्य वाढू शकतो.

## प्रकाश आंबेडकरांनी घेतली मोठी भूमिका

**नाशिक :** प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भाषणात न घेतल्याने नाशिकमध्ये म ोठा वाद निर्माण झाला आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी तीव्र शब्दांत निशाणा साधला असून, त्यांच्यावर 'अ‍ॅट्रोसिटी' अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची म ागणी केली आहे.नाशिकमध्ये ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी उपस्थितांना संबोधित केले. प्रजासत्ताक दिन हा संविधानाच्या अंमलबजावणीचा दिवस असतानाही, महाजन यांनी आपल्या संपूर्ण भाषणात एकदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख केला नाही. पालकमंत्र्यांनी हे नाव जाणीवपूर्वक टाळले की ते विसरले, याबाबत संभ्रम असला तरी या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत.

## अंबादास दानवे यांना कोणत्या पक्षाकडून वारंवार पक्षप्रवेशाची ऑफर?

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना नेते तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांच्याबद्दल धक्कादायक वक्तव्य केलं. अंबादास दानवे लवकरच आमच्या पक्षात आलेले बघायला मिळतील, असं वक्तव्य उदय सामंत यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. त्यांच्या या वक्तव्यावर अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी उदय सामंत यांचा दावा फेटाळला. तसेच आपल्याला लोकसभा निवडणुकीपासून विविध पक्षांकडून पक्षप्रवेशाच्या ऑफर येत असल्याचं म्हटलं. पण अशा ऑफरला अर्थ नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.मला वाटतं उदय सामंत असं बोलले नाहीत. तुम्हाला स्पष्ट सांगायचं तर मी त्यांनाच फोन केला होता. मला त्यांनी सांगितलं की ते काय म्हणाले. त्यांचं वक्तव्य फार गंभीरपणे घेण्याची गरज नाही. मी शिवसेनाप्रमुखांचा शिवसैनिक आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात काम करणारा शिवसैनिक आहे. त्यांच्यावर रोज टीका करतो म्हणून त्यांना



पत्रकारांनी अशा पद्धतीने प्रश्न विचारला आणि त्यांनी म्हणून अशा पद्धतीने उत्तर दिलं. पण माझ्या टीकेचा जोर आणखी वाढेल हे देखील मी सांगतो. त्यांचं जे स्वप्न आहे ते पूर्ण होणार नाही', असं रोखठोक प्रत्युत्तर अंबादास दानवे यांनी दिलं.चर्चे ला आपण काही करु शकत नाही. निश्चित काही लोकं मैत्रीमध्ये बसल्या-उठल्यावर बोलत असतात की, असं तसं. आता सगळेच लोक बोलत असतात. भाजपचे लोक ग्रामपंचायतीच्या लोकांनाही बोलत असतात', असं अंबादास दानवे म्हणाले.म ला असं वाटतं मी संघटनेचं काम करणारा शिवसैनिक आहे. आता नाही तर मागच्या ३० वर्षांपासून काम करणारा शिवसैनिक आहे.

## भाईसाठी शिंदे सेना कडाडली! गणेश नाईकांच्या 'त्या' विधानाचा घेतला समाचार

**मुंबई :** राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असले तरी, अंतर्गत वादाचे फटाके आता उघडपणे फुटू लागले आहेत. भाजप नेते आणि माजी मंत्री गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या बोचऱ्या टीकेमुळे शिवसेनेच्या (शिंदे गट) गोटात तीव्र संताप व्यक्त होत आहे. 'भाजपने परवानगी दिली, तर त्यांचे नामोनिशाण संपवून टाकू,' या नाईकांच्या आव्हानाला आता उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी सडेतोड उत्तर दिले असून, नवी मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.गणेश नाईकांच्या आव्हानावर पत्रकारांशी बोलताना शंभुराज देसाई यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली. ते म्हणाले की, 'राजकारणात कोणीच कोणाला कमी समजू नये.





एखाद्याला संपवण्याची भाषा जर कोणी करत असेल, तर समोरचे काही हाताची घडी घालून बसलेले नाहीत. आम्हालाही राजकारण कळते. जर आमच्या नेतृत्वावर अशी टीका झाली, तर वेळ आल्यावर आम्ही सुद्धा आमची भूमिका घेऊ आणि आमचा पक्ष नाईकांना तोडीस तोड उत्तर देईल.'शंभुराज देसाईंनंतर आता शिवसेनेचे युवा आमदार, मंत्री योगेश कदम यांनी नाईकांना थेट शिंगावर घेतले आहे. 'गणेश नाईक स्वतः मूळचे शिवसैनिक आहेत, त्यामुळे शिवसैनिक काय करू शकतो हे त्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही,' अशा शब्दांत कदमांनी नाईकांना जुन्या आठवणींची आणि शिवसैनिक स्टाईलची आठवण करून दिली आहे.नंदुरबार दौऱ्यावर असलेल्या योगेश कदम यांनी गणेश नाईकांच्या विधानावर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, 'एक महानगरपालिका म्हणजे काय संपूर्ण महाराष्ट्र होत नाही. एका शहराचे राजकारण पाहून त्यांनी एवढी मोठी विधाने करू नयेत. गणेश नाईक यांनी आता स्वतःच्या भाषेवर आणि वागण्यावर आवर घातला पाहिजे.'

गणेश नाईकांच्या विधानावर बोलताना संजय शिरसाट यांचा पारा चढला. ते म्हणाले, 'गणेश नाईकांचं जरा जास्तच व्हायला लागलंय. नामोनिशाण मिटवायला हे काय नवी मुंबईचे डोंगर आहेत का? आम्ही जिद्दीने उभे राहणारे लोक आहोत. एकनाथ शिंदेंमुळे तुम्ही आज सत्तेत आहात, हे विसरू नका. देवेंद्र फडणवीस यांच्याकडून काय आदेश घ्यायचे ते घ्या, पण वारंवार अशा वल्गना करून तुम्ही मोठे होत नाही.'

शिरसाट पुढे म्हणाले की, 'आम्ही महायुतीचा धर्म पाळतोय याचा अर्थ असा नाही की आम्हाला काही कळत नाही. आमचा त्याग आहे म्हणून आज ही सत्ता आहे. शिंदेंना हलक्यात घेण्याची चूक करू नका, यावर मी स्वतः फडणवीसांशी बोलणार आहे.

# तवेरावर संशय, अडवताच सुस्साट पळवली; पोलिसाने बोनेटवर उडी मारून काच फोडली अन घबाड हाती..!

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात मध्यरात्री एखाद्या फिल्मी थरारालाही मागे टाकेल, अशी घटना घडली. गुन्हे शाखेच्या पथकाने जीवाची बाजी लावत चक्क धावत्या कारच्या बोनेटवर उडी मारून नशेच्या बाटल्यांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. केंब्रिज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय अशा १५ किलोमीटरच्या थरारानंतर पोलिसांनी तिघांना बेड्या ठोकल्या असून, १८ लाख ७८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.शेख समीर राजासाब २४, रा. लातूर, सय्यद अल्ताफ वहाब २३, रा. उदगीर आणि उमर अब्दुल साहाब शेख ३६, रा. लातूर या तिघांना अटक केली आहे. तर मुख्य आरोपी अशपाक पटेल रा. चंपाचौक आणि लातूरच्या मराठवाडा मेडिकलचे चालक-मालक यांचा पोलीस शोध घेत आहेत. याप्रकरणी गुन्हे शाखा यांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर शहरात नाकाबंदी सुरू असताना एका संशयास्पद तवेरा कारला थांबण्याचा इशारा देण्यात आला, मात्र चालकाने गाडी न थांबवता ती सुसाट पळवली. पोलिसांनी पाठलाग सुरू केल्यावर आरोपींनी चक्क पोलिसांच्या अंगावर गाडी घालून त्यांना चिरडण्याचा प्रयत्न केला. हा धोकादायक प्रकार सुरू असतानाच पोलीस अंमलदार दादासाहेब झारगड यांनी विलक्षण धाडस दाखवले. त्यांनी स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता थेट धावत्या तवेराच्या बोनेटवर उडी मारली आणि लाठीने काच फोडून गुन्हेगारांना रोखण्याचा प्रयत्न केला.पाठलाग टीव्ही सेंटर ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरापर्यंत सुरूच होता. पंचायत समितीसमोर पोलिसांनी सापळा लावून पुन्हा कार अडवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपींनी पोलीस अंमलदार गणेश सागरे यांच्या अंगावर गाडी घातली, ज्यात ते जखमी झाले. अखेर समोरून रस्ता ब्लॉक असल्याचे लक्षात आल्यावर आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, पण चार पथकांनी त्यांना घेराव घालून जेरबंद केले. पोलीस आयुक्त प्रवीण पवार स्वतः या संपूर्ण ऑपरेशनवर कॉन्फरन्स कॉलद्वारे लक्ष ठेवून होते.नशेचा काळाबाजार आणि लातूर कनेक्शन....



या कारवाईत पोलिसांनी ३,१२० नशेच्या सिरप बाटल्या जप्त केल्या आहेत. तपासात धक्कादायक माहिती समोर आली की, लातूरच्या 'मराठवाडा मेडिकल'मधून केवळ ८० रुपयांना मिळणारी ही बाटली संभाजीनगरात ४०० रुपयांना विकली जात होती. १८ लाख ७८ हजार रुपयांच्या मुद्देमालासह पोलिसांनी ही तस्करी मोडून काढली आहे. या धाडसी कारवाईमुळे शहरातील अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## अवघ्या २४ वर्षांच्या कीर्तीने आयुष्य संपवलं

**बंगळुरु :** हुंड्यासाठी सासरी होणाऱ्या छळाला कंटाळून २४ वर्षीय विवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कर्नाटक राज्यात बंगळुरु येथील येडियूर तलावाजवळ राहणाऱ्या महिलेने आयुष्याची अखेर केली. काही काळापूर्वी ८ लाख रुपये दिले असताना, पती आणि सासरच्या मंडळींनी घर बांधण्यासाठी अधिक पैशांची मागणी करत छळ केल्याने तिने टोकाचे पाऊल उचलले.अवघ्या २४ वर्षांच्या कीर्ती हिने बंगळुरुमधील येडियूर तलावाजवळ आत्महत्या केली. तिच्या लग्नाला जेमतेम दोन वर्षे झाली होती. कीर्तीच्या पालकांनी आरोप केला, की आत्महत्या नसून, हुंड्याच्या लोभामुळे झालेली हत्या आहे.कीर्ती मूळची कर्नाटकातील मधुगिरी येथील रहिवासी होती. तिचे लग्न नोव्हेंबर २०२३ मध्ये गुरुप्रसादशी झाले होते. तिच्या लग्नावर तिच्या पालकांनी ३५ लाख रुपये खर्च केले होते. लग्नाच्या काही महिन्यांनंतर, तिचा नवरा आणि त्याच्या कुटुंबाने तिला पैशांसाठी त्रास देण्यास सुरुवात केली.गेल्या महिन्यात,



डिसेंबरमध्ये तिचा नवरा गुरुप्रसादने घर बांधण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली. तिच्या पालकांनी ८ लाख रुपये दिले, परंतु छळ थांबला नाही. या त्रासामुळे कीर्तीने आपले जीवन संपवले.हा प्रकार समोर आल्यानंतरही गुरुप्रसादने तिच्या पालकांना खोटे सांगितले की, कीर्ती बेशुद्ध पडली आहे. जेव्हा ते रुग्णालयात पोहोचले, तेव्हा त्यांना आपली मुलगी मृतावस्थेत असल्याचे आढळले. धक्का बसलेल्या पालकांनी पोलिसात तक्रार दाखल केली.मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून, अंत्यसंस्कारांसाठी कीर्तीचा मृतदेह मधुगिरी येथे तिच्या कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आला आहे. पोलिसांनी तिचा नवरा गुरुप्रसाद आणि त्याच्या कुटुंबाविरुद्ध एफआयआर दाखल केला.

## घरातून निघाला अन तीन दिवसांनी मुलाची बॉडी

**सातारा :** महाबळेश्वरच्या केटसब पॉइंटवरून ४०० फूट खोल दरीत उडी मारून १८ वर्षांच्या तरुणाने आपल्या आयुष्याची अखेर केल्याची घटना उघडकीस आली आहे. भगवतसिंह मदनसिंह सोळंकी (रा. ढेबेवाडी, ता. पाटण), असं मृत मुलाचे नाव असल्याची माहिती आहे. तो पाटण तालुक्यातील ढेबेवाडी गावातील रहिवासी होता. त्याने सीईटी परीक्षेचा फॉर्म भरला नव्हता. त्या नैराश्यातून त्याने हे टोकाचे पाऊल उचललं असावं, असा ढेबेवाडी पोलिसांनी संशय आहे.मूळचे राजस्थानचे असलेले सोळंकी कुटुंब व्यवसायाच्या निमित्ताने गेल्या २० वर्षांपासून ढेबेवाडीमध्ये स्थायिक आहे. ढेबेवाडी बाजारपेठेत त्यांचा बेकरी आणि स्वीट्सचा व्यवसाय आहे. याच कुटुंबातील भगवतसिंह सोळंकी हा १८ वर्षांचा तरुण महाविद्यालयीन शिक्षण घेत होता. त्याने सीईटीचा फॉर्म भरला नव्हता. त्यामुळे तो नैराश्यात होता. फॉर्म न भरण्याचे कारण मात्र स्पष्ट झालेले नाही.भगवतसिंह सोळंकी हा शुक्रवारी (२३ जानेवारी) कोणाला काहीही न सांगता घरातून निघून गेला होता. तेव्हापासून तो बेपत्ता होता. कुटुंबीयांनी शोधाशोध करूनही त्याचा थांगपत्ता लागत नव्हता. म्हणून मुलगा बेपत्ता असल्याची तक्रार कुटुंबीयांनी ढेबेवाडी पोलीस ठाण्यात दिली होती. मिसिंगचा मेसेज सातारा जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात गेला होता. त्याच्या मोबाईलचे लोकेशन महाबळेश्वरच्या केट्स पॉइंट परिसरात दाखवत होते. त्यामुळे पाचगणी पोलिसांनी सह्याद्री ट्रेकर्स, प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्सना पाचारण केले.महाबळेश्वर ट्रेकर्सचे सुनील भाटिया, सुनील



केळगणे, जयवंत बिरामने, पृथ्वी बिरामने, सौरभ गोळे, सौरव सालेकर, अक्षय नाविलकर, विशू सपकाळ, आतेश धनावडे, प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमचे अनिकेत वागदरे, आशिष बिरामने यांनी केट्स पॉइंटवरील ४०० फूट खोल दरीत उतरल्या. त्यावेळी त्यांना १८ वर्षांच्या मुलाचा मृतदेह सापडला. मृतदेह दरीतून वर आणल्यानंतर पाचगणी पोलिसांनी तो शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला.रुग्णालयात मृत तरूणाचे कुटुंबीय, पाचगणी आणि ढेबेवाडी पोलीस घटनास्थळी उपस्थित होते. मुलाचा मृतदेह पाहून सोळंकी कुटुंबीयांनी केलेला आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा होता. शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला. मदनसिंह सोळंकी यांच्या दोन मुलांपैकी थोरला मुलगा डॉक्टर आहे तर भगवतसिंह हा महाविद्यालयीन शिक्षण घेत होता. ढेबेवाडीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पी. एस. डाईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार धीरज मुळे हे या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# पुण्यात पाच मित्रांनीच विकीला संपवलं ; आरोपी अटकेत

**पुणे :** पुण्यातील खराडी भागात एका तरुणाचा निर्घृण खून करून फरार झालेल्या पाच सराईत गुन्हेगारांना लातूर पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरात सुरू असलेल्या कडेकोट बंदोबस्तादरम्यान ही मोठी कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे, एका व्हॉट्सॲप फोटोमुळे या गुन्हेगारांची ओळख पटली आणि लातूरच्या एमआयडीसी पोलिसांनी पुण्याच्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या.रविवारी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला लातूरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे 'चार्ली पथक' भांबरी चौक ते साई नाका रिंगरोड परिसरात गस्त घालत होते. यावेळी एका पेट्रोल पंपाजवळ अंधारात झाडाखाली पाच तरुण संशयास्पद रितीने बसलेले पोलिसांना आढळले. त्यांचे वय अवघे १८ ते २० वर्षे होते. पोलिसांनी हटकले असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, ज्यामुळे पोलिसांचा संशय बळावला आणि त्यांनी पाचही जणांना ताब्यात घेतले.ताब्यात घेतलेल्या तरुणांची सखोल चौकशी सुरू असतानाच, चार्ली पथकाने त्यांचे फोटो पुणे पोलिसांच्या अधिकृत ग्रुपवर शेअर केले. अवघ्या काही मिनिटांतच पुणे पोलिसांकडून दुजोरा मिळाला की, हे पाचही तरुण २४ जानेवारी रोजी पुण्यातील वाघोली-खराडी भागात झालेल्या खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी आहेत. त्यांच्यावर पुणे पोलिसांत भारतीय न्याय संहितेच्या (इछड) कलम १०३ (१) अन्वये गंभीर गुन्हा दाखल आहे.कैलास विठ्ठल राठोड (रा. खराडी, पुणे), गणेश चंद्रकांत कट्टे (रा. खराडी, पुणे), सुशील सुभाष कदम (रा. खराडी, पुणे), करण विठ्ठल तुरे (रा. चंदन नगर, पुणे), रोहित विकास गायकवाड (रा. नानापेठ,



पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.रात्री उशिरा १ वाजेपर्यंत चाललेल्या या कारवाईनंतर लातूर पोलिसांनी पाचही आरोपींना पुढील तपासासाठी पुणे पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान चवरे आणि त्यांच्या टीमने ही धाडसी कारवाई पूर्ण केली. मित्राच्या घरी जमलो, गप्पा गोष्टी झाल्या आणि क्षुल्लक वादातून मित्रांनीच मित्राचा काटा काढल्याची धक्कादायक घटना पुण्याच्या वाघोली परिसरात घडली होती. शनिवारी (२४ जानेवारी) रात्री उशिरा वाघोलीतील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये २१ वर्षीय तरुणाची त्याच्याच पाच मित्रांनी गळा चिरून निर्घृण हत्या केली. ज्या ठिकाणी हा थरार घडला, त्याच्या समोरच गुन्हे शाखेचे कार्यालय असून आरोपींनी हे धाडस केल्याने परिसरात खळबळ उडाली होती. मृत विकी विजय दिवटे (वय २१, रा. चंदननगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत) आणि त्याचे पाच मित्र शनिवारी रात्री वाघोलीच्या बायफ रोडवरील 'आर. पी.एस. हेरिटेज' सोसायटीमध्ये आले होते. या सोसायटीच्या १० व्या मजल्यावर राहणारा मित्र प्रतीक मोरे याच्या फ्लॅटवर हे सर्वजण जमले होते. रात्री साडेअकराच्या सुमारास त्यांच्यात काही कारणावरून वाद सुरू झाला. शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर लवकरच हाणामारीत झाले आणि रागाच्या भरात मित्रांनी विकीवर चाकूने सपासप वार केले.

# मुंबई इंडियन्सचा नाद करायचा नाय.. आरसीबीवर विजयासह रचला इतिहास

**वडोदरा/वृत्तसंस्था :** मुंबई इंडियन्सचा नाज करायचा नाय... हे आजच्या सामन्यात सर्वांनी पाहिले. मुंबई इंडियन्सने आरसीबीवर दिमाखात विजय साकारला, पण त्याचबरोबर त्यांनी इतिहास रचला. कारण आजपर्यंत या स्पर्धेत जी गोष्ट कधीच घडली नव्हती, ती यावेळी पाहायला मिळाली. मुंबई इंडियन्सने या निर्णायक सामन्यात आरसीबीवर १५ धावांनी विजय साकारला आणि इतिहास रचला.मुंबई इंडियन्सला तिसऱ्या षटकात पहिला धक्का बसला. पण त्यानंतर मुंबईच्या संघाने मागे वळून पाहिलेच नाही. कारण त्यानंतर या सामन्यात दिमाखदार फटकेबाजी केली ती नॅट सिव्हर ब्रंटने. कारण या सामन्यात ब्रंटने



अशी धडाकेबाज फटकेबाजी सुरु केली की, आरसीबीच्या गोलंदाजांच्या तोंडचे पाणीच तिने पळवले. ब्रंटला यावेळी सलामीवीर हिली मॅथ्यूजची चांगली साथ मिळाली. मॅथ्यूजने या सामन्यात ९ चौकारांच्या जोरावर ५६ धावांची खेळी साकारली, पण तिला शतक मात्र झळकावता आले नाही. पण मॅथ्यूज बाद झाली असली तरी ब्रंटने मात्र आपली तुफानी फटकेबाजी सुरुच ठेवली होती. ब्रंटने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि ती शतकाच्या दिशेने कूच करत होती. आतापर्यंत थङ्क च्या एकाही मोसमात शतक पाहायला मिळाले नव्हते. पण ब्रंटने या सामन्यात स्पर्धेतील पहिले वहिले शतक झळकावले. ब्रंटने या सामन्यात ५७ चेंडूंत १६ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर नाबाद १०० धावांची खेळी साकारली. त्यामुळेच मुंबईच्या संघाला या सामन्यात १९९ धावांचा डोंगर उभारता आला.आरसीबी मुंबई इंडियन्सच्या २०० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरले खरे, पण त्यांना सुरुवातीलाच मोठे धक्का बसले. स्मृती मानधना सहा धावांवर बाद झाली आणि त्यानंतर आरसीबीचा डाव गडगडायला लागला. आरसीबीची या सामन्यात ५ बाद ३५ अशी अवस्था झाली होती. पण त्यानंतर रिचा घोषने अर्धशतक झळकावत संघाचे आव्हान कायम ठेवले होते, पण विजयासाठी धावा एवढ्या जास्त होत्या की, तिला संघाला विजय मिळवून देता आला नाही. मुंबईकडून सर्वाधिक तीन विकेट्स मॅथ्यूजने यावेळी घेतले.मुंबई इंडियन्सने निर्णायक सामन्यात आरसीबीवर दणदणीत विजय साकारला. मुंबईसाठी हा विजय नक्कीच आशादायी ठरला आहे.

## दोन मॅचविनर खेळाडू संघाबाहेर, सूर्याची चिंता वाढली..

**गुवाहाटी :** भारतीय संघाने दिमाखात न्यूझीलंडवर तिसऱ्या टी २० सामन्यात विजय मिळवला होता. भारताचा हा सलग तिसरा विजय ठरला. त्यामुळे भारताने तिसऱ्या टी २० सामन्यात विजय मिळवला आणि ही मालिकाही जिंकली. पण हा तिसरा सामना झाला आणि भारतासाठी सर्वात मोठी वाईट बातमी आली आहे. कारण आता तब्बल दोन मॅचविनर खेळाडू संघात खेळू शकणार नाही, अशी माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आता कर्णधार सूर्यकुमार यादवची चिंता नक्कीच वाढलेली असेल.भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वनडे मालिका सुरु होती. त्यावेळी फिल्डींग करताना वॉशिंग्टनम सुंदरला दुखापत झाली होती. पण सुंदरला दुखापत झाली असतानाही गौतम गंभीर यांनी त्याला फलंदाजीसाठी पाठवले आणि त्याची दुखापत बळावली. सामना संपल्यावर लगेच सुंदरला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. सुंदरचा आता वैद्यकीय अहवाल समोर आला आहे. या वैद्यकीय अहवालानुसार आता सुंदर वर्ल्ड कपच्या पहिल्या सामन्यातही खेळू शकणार नसल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे भारतासाठी हा एक मोठा धक्का असेल.भारतीय टी २० संघात सर्व काही आलबेल सुरु आहे, तरीही अजून एक मॅचविनर खेळाडू भारताच्या संघात नाही. पण आता हा खेळाडू उर्वरीत दोन्ही सामन्यांमध्ये खेळणार नसल्याचे समोर आले आहे. भारताचा धडाकेबाज खेळाडू तिलक वर्माला काही दिवसांपूर्वी दुखापत झाली होती. पण तो चौथ्या आणि पाचव्या टी २० सामन्यात खेळेल, असे सांगितले गेले होते. तिलक वर्मा फिट झाल्याचे म्हटले होते. पण एक तर संघात श्रेयस अय्यर आहे, ज्याला अजून संधी मिळालेली नाही. त्यामुळे आता तिलक वर्माला संघाबरोबरही न ठेवण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आगामी वर्ल्ड कप पाहता सूर्यकुमार यादवची चिंता नक्कीच वाढलेली असेल.

## पाकिस्तानच्या प्रशिक्षकाला लोकं देतायत शिव्या, जगासमोर लाज गेली, नेमकं काय म्हणाला?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाकिस्तानचा प्रशिक्षक आणि ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू जेसन गिलेस्पीला लोकं जोरदार शिव्या द्यायला लागली आहेत. गिलेस्पीची आता जगासमोर लाज गेली आहे. त्यामुळे पाकिस्तानचं प्रशिक्षक होणं काय असतं हे आता गिलेस्पीला समजलं असेल.बांगलादेशने भारताला धक्का देण्यासाठी वर्ल्ड कपचा सहारा घेतला. भारतामध्ये आम्ही वर्ल्ड कपचे सामने खेळणार नाही, असे त्यांनी आयसीसीला सांगितले. पण आयसीसीने त्याची मागणी मान्य केली नाही. त्यामध्येच पाकिस्तानने एंट्री घेतली आणि आगीत तेल टाकण्याचे काम केले. बांगलादेशला पाकिस्तानने फितवले आणि त्यांना बहिष्कार टाकण्याचा पर्याय सुचवला. बांगलादेशने पाकिस्तानवर विश्वास ठेवला आणि त्यांनी वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला. त्यानंतर पाकिस्तानने काढता पाय घेतला आणि बांगलादेशला बर्बाद केले. बांगलादेशला आता ही गोष्ट समजली आहे आणि त्यामुळेच ते आयसीसीची मनधरणी करत आहेत. पण हे सर्व होत असताना पाकिस्तानचा प्रशिक्षक जेसन गिलेस्पीला मात्र लोकांच्या शिव्या खाव्या लागत आहेत.



पाकिस्तानचा प्रशिक्षक असलेल्या जेसन गिलेस्पीने एक ट्विट केलं होतं. याट्विटमध्ये त्याने लिहिलं होतं की, ' बांगलादेशला वर्ल्ड कपच्या बाहेर करून आयसीसीने फार मोठी चूक केली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानकडे होते. पण भारताने पाकिस्तानात खेळण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांना पाकिस्तानच्या बाहेर खेळण्याची सवलत मिळाली. पण बांगलादेशबरोबर मात्र आयसीसीने असं केलं नाही. त्यामुळे आयसीसीला या दुटप्पीपणाबाबत आपले उत्तर द्यावे लागेल. ' जगात नेमकं काय चालू आहे, हे गिलेस्पी यांनी माहिती नसावे आणि त्यामुळेच त्यांनी हे ट्विट केले आहे. पण गिलेस्पी यांच्यावर अखेर हे ट्विट डिलीट करण्याची नामुष्की ओढवली. संपूर्ण जगातील चाहत्यांनी त्यांना शिव्या दिल्या आणि त्यामुळेच त्यांची आता जगासमोर लाज गेली आहे. कारण नेमकी गोष्ट माहिती नसताना त्यांनी केलेलं ट्विट त्यांच्यासाठी भारी पडलं आणि त्यांना ते ट्विट डिलीट करावं लागलं.पाकिस्तानचा प्रशिक्षक होणं हे किती धोक्याचं आहे, हे आता गिलेस्पीला कळलं असेल. कारण त्यांच्यावर आता नामुष्कीची वेळ आली आहे.

# पाकिस्तानने भारताला झुकवण्यासाठी आखला मोठा प्लॅन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशला काही भारताला धक्का देता आला नाही आणि त्यांनी वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकत आपल्याच पायावर धोंडा मारून घेतला. पण आता भारताला झुकवण्यासाठी पाकिस्तानने एक मोठा प्लॅन आखला आहे. पाकिस्तान संपूर्ण वर्ल्ड कपवर बहिष्कार नाही टाकणार, पण त्यांनी आत एक वेगळी चाल खेळण्याचा निर्णय घेतला असल्याचे समोर येत आहे.वर्ल्ड कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील बांगलादेशचा सहभाग आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने रद्द केल्यावर पाकिस्तानने वर्ल्ड कप स्पर्धेत न खेळण्याचा सूर आळवण्यास सुरुवात केली होती. मात्र, वर्ल्ड कपमध्ये न खेळल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील, असा इशारा आयसीसीने दिला. त्यानंतर काही तासांतच पाकिस्तानने वर्ल्ड कप स्पर्धेसाठी संघ जाहीर करून स्पर्धेबाबतून माघारीची चर्चा थांबवल्याचे संकेत दिले होते. पण आता भारताला धक्का देण्यासाठी ते एक नवीन चाल खेळत असल्याचे आता समोर येत आहे. त्यामुळे भारताला धक्का बसले, असे पाकिस्तानला वाटत आहे.बांगलादेशने वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला. पाकिस्तानने बांगलादेशला चिथावले होते, त्यामुळे बांगलादेशने हा निर्णय घेतल्याचे म्हटले जाते. पण दुसरीकडे पाकिस्तानने आपला संघ जाहीर केला आणि त्यांनी आपण वर्ल्ड कप खेळणार असल्याचे संकेत दिले, पण





तरीही आता त्यांच्या मनात एक वेगळा प्लॅन सुरु झाला आहे. भारतामधील संपूर्ण वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकायचा नाही, तर भारताचा निषेध करण्यासाठी त्यांच्याबरोबरच्या सामन्यावर बहिष्कार टाकायचा, असे पाकिस्तान ठरवत आहे. त्यामुळे वर्ल्ड कपमध्ये भारताविरुद्धच्या सामन्यात खेळायचे नाही, जेणेकरून भारतावर आमचा बहिष्कार असल्याचे सिद्ध होईल, असे पाकिस्तानला वाटत आहे. पण ही गोषअट तेवढी सोपी नक्कीच नसेल. कारण त्यासाठी पाकिस्तानला मोठ्या परिणामांना समोरे जावे लागू शकते. त्यामुळे पाकिस्तानला आपल्या निर्णयाचा पुन्हा एकदा विचार करावा लागणार आहे.बांगलादेशला भारताने वर्ल्ड कपचया बाहेर काढले, असे पाकिस्तानला वाटते. पण बांगलादेशनेच वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला, हे सत्य आहे. त्यामुळे आता पाकिस्तान अजून भारताला धक्का कसा देणार, याककडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# अभिनेत्रीने सुरू केला कॅफे, उषा नाडकर्णींनी केलं उद्घाटन

**मुंबई :** मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळी आता अभिनयासह उद्योग क्षेत्रातही पाऊल टाकत आहेत. मराठीसह हिंदी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी अभिनय क्षेत्रात कार्यरत असण्याबरोबरच उद्योग क्षेत्रात आपली नवी सुरुवात केली आहे. कोणी स्वत:चा साड्यांचा ब्रँड, कुणी दागिन्यांचा ब्रँड, कुणी स्वत:चं सेलॉन सुरू केलं, तर कुणी स्वत:चं हॉटेल.

अशातच आता यात आणखी एका लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रीची भर पडली आहे, ही अभिनेत्री म्हणजे अर्चना गौतम. बिग बॉस १६ आणि 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' या शोमधून प्रसिद्धीझोतात आलेली अर्चना गौतम आता बिझनेसवूमन झाली आहे. अभिनेत्रीने नुकतंच स्वत:चा कॅफे सुरू केला आहे. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर तिनं आपल्या या नवीन कॅफेची सुरुवात केली आहे.

र्चनानं सुरू केलेल्या या नवीन कॅफेचं उद्घाटन ज्येष्ठ मराठी अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या हस्ते पार पडलं. याचे काही खास फोटो अर्चनानं आपल्या सोशल मीडिया अकाउंटद्वारे शेअर केले आहेत. तसंच अर्चनानं उषा नाडकर्णींचे आभारही मानले आहेत. अर्चना म्हणते, जे लोक आपले असतात,



ते नेहमीच आपल्याशी मनानं जोडलेले राहतात. उषा नाडकर्णी तुमचे मनःपूर्वक आभार. दिवाळीच्या शुभप्रसंगी Oye Churros कॅफेचे उद्घाटन तुमच्या हातून झालं ही आमच्यासाठी आनंदाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. या नव्या प्रवासासाठी तुमचे आशीर्वाद मिळणं, ही खूप सुंदर सुरुवात आहे.

अर्चनानं शेअर केलेल्या या नव्या कॅफ ेच्या फोटोंवर प्रेक्षकांनी कमेंट्सद्वारे तिचं कौतुक केलं आहे. तसंच तिच्या या नव्या सुरुवातीसाठी तिला खास शुभेच्छाही दिल्या आहेत. दरम्यान, बिझनेसवूमन झालेली अर्चना ही सध्याच्या लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रींपैकी एक आहे. तिनं मॉडेल म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१५ मध्ये आलेल्या 'ग्रेट ग्रँड मस्ती' या बॉलीवूड चित्रपटातील एका छोट्या भूमिकेतून तिनं अभिनय क्षेत्रात पाऊल टाकलं. यानंतर तिनं 'हसीना पारकर' आणि 'बारात कंपनी'सारख्या चित्रपटांमध्येही काम केलं आहे.

चित्रपटांबरोबरच अर्चना 'साथ निभाना साथिया' आणि 'ये है आशिकी'सारख्या टीव्ही मालिकांम ध्येही दिसली आहे. मालिका आणि चित्रपटानंतर तिनं आपला मोर्चा रिॲलिटी शोकडे वळवला. ती 'बिग बॉस १६'मध्ये सहभागी झाली होती आणि नंतर 'खतरों के खिलाडी'मध्येही ती दिसली. शिवाय नुकताच तिनं 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' हा शोदेखील केला. यानंतर आता अर्चनाने व्यवसाय क्षेत्रात आपली नवीन सुरुवात केली आहे. तिनं स्वत:चा कॅफे सुरू केला आहे.

## महेश कोठारे यांच्या समर्थनार्थ मेघा धाडेची पोस्ट चर्चेत

**मुंबई :** अलीकडेच अभिनेते, निर्माते महेश कोठारे यांच्या एका व्हायरल व्हीडियोनंतर जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. या व्हीडियोमध्ये महेश कोठारे हे भाजपावर स्तुतिसुमने उधळताना दिसत आहेत. एका कार्यक्रमात त्यांनी मी मोदी भक्त आहे आणि मुंबई महापालिकेत कमळच फ ुलेल असे वक्तव्य केले. तसेच त्यांनी संजय राऊत आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावरही टीका केली.



यानंतर महेश यांच्यावर अनेकानी टीका केल्या. पण अभिनेत्री मेघा धाडेने मात्र महेश यांची पाठराखण केली आहे. म ेघा यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. ज्यात त्या म्हणतात, 'अभिनेत्री उर्मिला मातोंडकरने उध्दव सेना जॉइन केली होती तेव्हा कोणत्याही भाजप प्रवक्त्याने तिच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्षेप घेतला नव्हता, सुप्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकरने तर मनसेच्या तिकिटावर लोकसभा लढवली होती तरी कोणी आक्षेप घेतला नाही.

परंतु महेश कोठारेंनी मोदींची तारीफ केली की उध्दव सेनेला इंगळ्या डसल्या कोठारेंवर टीकेची झोड उठवली गेली ! त्यांच्या मराठीपणावर देखील शंका घेण्यात आली. हे असे झाले कारण कोठारे जे बोलले ते मनापासून बोलले कोणत्या तिकीटाच्या लालसेपोटी, कोणाचे पाकीट मिळवण्यासाठी ते असे बोलले नाही एक सामान्य मुंबईकरांची जी भावना आहे जो मुंबईकर आधी रस्त्यावर धक्के खायचा तो आता मेट्रोत गार वाऱ्यात वेगाने प्रवार, करतोय जो मुंबईकर आधी ट्रॅफिक मध्ये अडकायचा आता तो अटल सेतूवरून सुसाट धावतोय त्या मुंबईकरांच्या भावनांचे प्रगटीकरण कोठारेंच्या भाषणात झाले आणि म्हणूनच उध्दव सेनेच्या पायाखालची जमीन सरकली ! आणि हे सत्यात देखील उतरणार आहे.'या पोस्टवर अभिनेते शरद पोंक्षे यांनीही कमेंट केली आहे. ते आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, मीही मोदांचं कौतुक करतो अमित शहांच कौतूक करतो.जेजे चांगले आहेत त्यांचं करतो. सद्य परिस्थितीत भाजप शिवाय देशाला पर्याय नाही माझं मत मांडले. द्या किती शिव्या द्यायच्यात त्या.' तर अनेकांनी या पोस्टवर तिने राजकारणात उतरु नये अशीही कमेंट केली आहे.

## हास्याचा फवारा घेऊन येणार किस किस को प्यार करु २

**मुंबई :** कॉमेडीयन कपिल शर्माचा नव्या चित्रपटाचे मोशन पोस्टर रिलीज झाले असून प्रदर्शनची तारीख आणि कलाकार देखील कोण असतील, हे कन्फर्म करण्यात आले आहे. कपिल शर्माचा किस किस को प्यार करू हा चित्रपट २०१५ मध्ये रिलीज झाला होता. आता पुन्हा मोठ्या पडद्यावर या चित्रपटाचा सीक्वल येतोय. निर्मात्यांनी चित्रपटाचे मोशन पोस्टर जारी करत रिलीज डेटची अधिकृत घोषणा केलीय.

चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच रिलीज करण्यात आले असून त्यात कपिल शर्मा पुन्हा एकदा आपल्या खास स्टाईलमध्ये दिसत आहे. सोशल मीडियावर हा पोस्टर व्हायरल झालाय. 'किस किसको प्यार करूं' या चित्रपटात कपिलची तीन पत्नी आणि एक गर्लफ्रेंड अशा विनोदी



गोंधळावर आधारित कथा होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत कपिलचा सिनेमॅटिक डेब्यू सुपरहिट ठरला होता. आता दुसऱ्या भागात कपिलच्या व्यक्तिरेखेत आणखी भन्नाट ट्विस्ट असणार असल्याचं दिग्दर्शकांनी सांगितलं आहे.

## थामा Vs एक दिवाने की दिवानियत, बॉक्स ऑफिसवर कोणता सिनेमा ठरला वरचढ?

**मुंबई :** सध्या बॉक्स ऑफिसवर 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा' या सिनेमांचा जलवा पाहायला मिळतोय. दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे दोन्ही चित्रपट चांगली कामगिरी करत आहेत. २१ ऑक्टोबरला रिलीज झालेल्या 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा'ने तीन दिवसांत किती कमाई केली, ते जाणून घेऊयात.

आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्या 'थामा' या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहांमध्ये गर्दी करत आहेत. या हॉरर कॉमेडीने रिलीजच्या फक्त तीन दिवसांतच जबरदस्त कमाई केली आहे. या चित्रपटाने अनेक सिनेमांचे रेकॉर्ड मोडले आहेत. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, 'थामा' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी २४ कोटी कमावले. दुसऱ्या दिवशी थामाच्या कमाईत घसरण झाली आणि १८.६ कोटींचे कलेक्शन केले. थामाने रिलीजच्या तिसऱ्या दिवशी १२.५० कोटी कमावले. थामाचे तीन दिवसांचे कलेक्शन




५५.१० कोटींवर पोहोचले आहे.

थामाने काजोलच्या 'मां' सिनेमाच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकले आहे. 'मां' ने भारतात ३६.०८ कोटी आणि जगभरात ४९.७५ कोटी कमावले. आता थामा लवकरच वरुण धवनच्या 'भेडिया' ला मागे टाकेल. भेडियाने भारतात ६८.९९ कोटींचे कलेक्शन केले होते. सनम तेरी कसम फेम हर्षवर्धन राणे व सोनम बाजवा यांच्या 'एक दिवाने की दिवानियत'ने देखील बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. सिनेमाने पहिल्या दिवशी ९ कोटी कमावले, दुसऱ्या दिवशी ७.५ कोटी कम ावले आणि तिसऱ्या दिवशी ६ कोटी रुपये कमावले. 'एक दिवाने की दिवानियत'चे तीन दिवसांचे कलेक्शन २२.७५ कोटी रुपये झाले आहे. 'एक दिवाने की दिवानियत'ने होमबाउंड (४.५७ कोटी), द बंगाल फाइल्स ९ (१९.५९ कोटी), निकिता रॉय (१.२८ कोटी), आंखों की गुस्ताखियां (१.८० कोटी), केसरी वीर (१.८८ कोटी), कंपकंपी (१.५० कोटी), द भूतनी (१२.५२ कोटी), फुले (६.७६ कोटी), ग्राउंड झिरो (७.७७ कोटी), क्रेझी (१४.०३ कोटी), सुपरबॉयज ऑफ मालेगाव (५.३२ कोटी), मेरे हसबंड की बीवी (१२.२५ कोटी), लव्हयापा (७.६९ कोटी) आणि इमर्जन्सी (२०.४८ कोटी) या चित्रपटांच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकलं आहे.

## हार्दिकने माहिकाचे रिलेशनशीप केले कन्फर्म!

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, मात्र या वेळी कारण क्रिकेट नव्हे तर त्याचं खासगी आयुष्य आहे. अलीकडेच हार्दिकने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत, ज्यातून त्याने मॉडेल माहीका शर्मासोबतचं नातं अधिकृत केल्याचं स्पष्ट होत आहे. क्रिकेट विश्वातील हा नवा 'लव्ह एंगल' सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. काही तासांतच फोटोंना लाखो लाईक्स आणि हजारो कमेंट्स मिळाल्या आहेत. हार्दिकचा हा रोमँटिक अंदाज पाहून चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आलं आहे. माहीका शर्मा ही ग्लॅमरस मॉडेल असून, तीने अनेक जाहिराती आणि म्युझिक व्हिडिओंमध्ये काम केलं आहे. दोघांच्या अफेअरच्या चर्चा काही आठवड्यांपासून सुरु होत्या, मात्र आता हार्दिकने स्वतः चं नातं ऑफिशियल केल्याने या चर्चांना पूर्णविराम लागला आहे. हार्दिक पांड्याने आधी अभिनेत्री नताशा स्टेनकोविकशी लग्न केले होते.

# प्रजासत्ताक दिनी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ सन्मानित...

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान...

**जनसंचलन/ बुलढाणा**

समाजातील विविध घटकांसाठी आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचा आज प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून वर्ष २०२५-२६ या कालावधीत पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसह समाजातील विविध घटकांसाठी आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात कौतुकास्पद कार्यक्रम व उपक्रम राबविले.



तसेच जिल्हा पोलीस प्रशासनाच्या मिशन परिवर्तन अंतर्गत बुलढाणा जिल्हा नशामुक्त व्हावा म्हणून नशामुक्तीवर आधारित विशेष कार्य केल्या केल्याबद्दल बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाला प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार संजय गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंह राजपूत यांच्यासह वरिष्ठ पत्रकार नितीन शिरसाट, चंद्रकांत बर्दे, राजेश डिडोळकर, युवराज वाघ, विलास खंडेराव, संतोष लोखंडे, सुनिल मोरे, अजय राजगुरे, मृणाल सावळे, रहमत अली आदी उपस्थित होते.

# डोणगाव ग्रामपंचायतीचा दिव्यांग निधी घोटाळा उघड!

**जनसंचलन/ डोणगाव**

ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दिव्यांगांसाठी राखीव असलेला ५% निधी सन २०१९ पासून जाणीवपूर्वक वाटप न केल्याचा धक्कादायक प्रकार




समोर आला आहे. शासनाने स्पष्ट आदेश दिले असतानाही दिव्यांगांच्या हक्काच्या निधीवर डल्ला मारल्याने ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या स्वउत्पन्नातील ५% निधी दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. या निधीतून स्वयंरोजगार, घरकुल, शिक्षण आदी योजनांचा लाभ दिला जातो. मात्र डोणगावात हा निधी वर्षानुवर्षे ङ्कङ्खकागदावरचफ्फ असल्याचे चित्र आहे. अर्जदार राजू उर्फ युनुस अहमद पुंजानी यांच्यासह अनेक दिव्यांग बांधवांनी सरपंच, उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी यांना निवेदन देत ४० ते १०० टक्के अपंगत्व असलेल्या पात्र दिव्यांगांना तात्काळ निधी वितरित करण्याची मागणी केली आहे. निधी खर्च न झाल्यास तो जिल्हा परिषदेच्या अपंग कल्याण निधीत जमा करण्याचे शासन निर्देशही धाब्यावर बसवण्यात आले आहेत. तात्काळ लेखी उत्तर व न्याय न मिळाल्यास आंदोलन व उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला असून, प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास याची मोठी किंमत मोजावी लागेल, असा थेट इशारा दिव्यांगांनी दिला आहे.

# स्वच्छ शहर जिल्ह्यात सिकलसेलचे ३१७ रुग्ण आढळले; प्रभावी नियंत्रण शक्य!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात सध्या ३१७ सिकलसेल बाधित रुग्ण असून, यासोबतच १,७३१ सिकलसेल वाहक नोंदणीकृत आहेत. विशेषतः आदिवासी तसेच काही विशिष्ट समाजघटकांमध्ये सिकलसेल ॲनिमियाचे प्रमाण अधिक आढळून येते. वेळेत निदान आणि योग्य उपचार केल्यास या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या वतीने अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. १५ जानेवारी ते ७फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत जनजागृती, मोफत तपासणी, सिकलसेल वाहक व रुग्णांची ओळख, समुपदेशन तसेच आवश्यक उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये आरोग्य पथकांमार्फत गृहभेटी देऊन सिकलसेल सोल्युबिलिटी तपासणी करण्यात येत आहे. या मोहिमेत शालेय विद्यार्थी, किशोरवयीन मुले, युवक-युवती तसेच १५ जानेवारी ते ७फेब्रुवारी दरम्यान राबवली जाणार मोहीम प्रजननक्षम वयोगटातील नागरिकांवर विशेष भर देण्यात आला आहे.



सिकलसेल हा संसर्गजन्य नसून आनुवंशिक आजार आहे, ही बाब नागरिकांपर्यंत पोहोचवून विवाहपूर्व आणि गर्भधारणेपूर्व तपासणीचे महत्त्व समजावून सांगण्यात येत आहे. जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक-सेविका, आशा स्वयंसेविका तसेच इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्य समन्वयातून ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन तपासणी करून घ्यावी, आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मते, सिकलसेल मुक्त बुलढाणा हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून राबविण्यात येणारी अरुणोदय मोहीम निरोगी पिढीच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. दरम्यान, नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडूनही करण्यात आले आहे.

# झेंडावंदन करताना अनर्थ! मुख्याध्यापकाचा धक्कादायक मृत्यू, गावभर हळहळ...

**जनसंचलन/बुलडाणा**

देशभरात प्रजासत्ताक दिनाचा उत्साह रंगून असताना मोताळा तालुक्यातील मोहेगाव गावातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ध्वजारोहणाच्या कार्यक्रमादरम्यान मुख्याध्यापक दिलीप राठोड यांना अचानक हार्ट अटॅक आला आणि त्यांचे दुर्दैवी निधन झाले. २६ जानेवारी सकाळी शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यासाठी एकत्र आले होते. आनंदाचे वातावरण असताना, मुख्याध्यापक राठोड यांनी ध्वजारोहणासाठी पुढे येताच अचानक त्यांना अस्वस्थता जाणवू लागली. काही क्षणातच ते कोसळले, आणि उपस्थित शिक्षकांनी



व ग्रामस्थांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण गाव हळहळेत डुंबले आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक क्षणातच आनंदाच्या जागी दुःखाचे सावट पसरले, तर शिक्षक आणि ग्रामस्थांनी शोक व्यक्त केला. ध्वजारोहणाच्या आनंदात अचानक आलेल्या या अनर्थाने गावात शोककळा पसरली आहे. मुख्याध्यापक राठोड हे शिक्षण क्षेत्रात आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या कार्याची, अनुशासनाची आणि विद्यार्थ्यांवरील प्रेमाची गावातील सर्वजण प्रशंसा करत होते. त्यांच्या अचानक निधनाने शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये रिक्तता निर्माण झाली आहे. गावातील ग्रामपंचायत तसेच शिक्षण विभागाने या दुर्दैवी घटनेबाबत शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. प्रजासत्ताक दिनाच्या आनंदात आलेला हा दुःखद प्रसंग शिक्षणविश्व आणि गावकऱ्यांसाठी चिंतेचा आणि हळहळेचा विषय बनला आहे.

# विकसित भारतासाठी आत्मनिर्भर बुलढाण्याचा संकल्प करूया ! जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

विकसित भारत २०४७ च्या विकासगाथेत बुलढाणा जिल्ह्याचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले जावे आणि प्रशासन, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी ङ्गआत्मनिर्भर बुलढाणाफघडवण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज केले. देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, विभाग प्रमुख, स्वातंत्र सेनानी, वीरमाता, वीरपत्नी, ज्येष्ठ नागरिक, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी पालक, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील पुढे म्हणाले की, भारत हा परिवर्तन, प्रगती आणि आत्मविश्वासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. आज प्रत्येक भारतीयाने ङ्गविकसित भारतचा संकल्प करण्याचा क्षण आहे. आज भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश तर आहेच, पण त्याचबरोबर जगातील प्रमुख अर्थव्यवस्थेपैकी एक राष्ट्र बनला आहे. हे यश कोट्यवधी भारतीयांच्या प्रामाणिक श्रमांचे फळ आहे. महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन मानले जाते आणि या विकासयात्रेत बुलढाणा जिल्हाही आत्मविश्वासाने पुढे जात आहे. शेती, उद्योग, शिक्षण, सहकार, डिजिटल सेवा, महिला सक्षमीकरण आणि युवक विकास या सर्व क्षेत्रांत जिल्हा उल्लेखनीय प्रगती करीत असल्याचे ते म्हणाले जिल्हाधिकारी डॉ. पाटील पुढे म्हणाले, यावर्षी जिल्ह्यात खरीप हंगामात ७ लाख २९ हजार हेक्टर व रब्बी हंगामात ३ लाख ७९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. खरीप हंगामात विविध पिकांचे उल्लेखनीय उत्पादन झाले असून रब्बीमध्ये हरभरा, गहू व मक्याची मोठ्या प्रमाणात लागवड झाली आहे. पारंपरिक शेतीसोबत फळबाग लागवड काळाची गरज आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजना व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत २२ हजार हेक्टरवर फळबाग लागवड झाली असून चालू वर्षी आणखी अडीच हजार हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे. अतिवृष्टी, पूर, गारपीट व वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासन खंबीरपणे उभे आहे. सन २०२५-२६ मध्ये ६ लाख १६ हजार हेक्टर क्षेत्राच्या नुकसानीसाठी ५६२ कोटींचा निधी मंजूर करून ६ लाख ४० हजार शेतकऱ्यांना ४२९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीसाठी पीककर्जाला प्राधान्य देत ७०२ कोटी रुपयांचे पीककर्ज वितरित करण्यात आले आहे. ॲग्रीस्टॅक अंतर्गत ४ लाख ८४ हजार शेतकरी ओळख क्रमांक तयार झाले असून उर्वरित शेतकऱ्यांनी नोंदणी करावी. तसेच रब्बी हंगामातील ई-पीक पाहणी उपक्रमात आतापर्यंत ८० हजार हेक्टरवरील प्लॉटवर नोंदी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित शेतकऱ्यांनी ई-पीक नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिगांव सिंचन प्रकल्पासाठी २२०० हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण होऊन १६०० कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. ४५०० हेक्टर जमिनीचे भूसंपादन अंतिम टप्प्यावर आहे. तसेच बाधित गावांचे पुनर्वसनही वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत ९६ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना दाखले देण्यात आले, १४४७ पाणंद रस्ते खुले झाले व १४२० गावांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध झाली आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून शाळा, अंगणवाड्या, आरोग्य केंद्रे, रुग्णालये व नगरोत्थानासाठी एकूण १२४.५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यासह आदिवासी बांधवांसाठी वनहक्क कायद्यान्वये ५१७ वनपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. लोणार सरोवराच्या संवर्धनासाठी आयआयटी मुंबईच्या सहकार्याने संशोधन केले जात आहे. तसेच पर्यटन वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली. प्रधानमंत्री व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत ८२९ उद्योगांना मंजुरी मिळून ६१२ उद्योग सुरू झाले आहेत. गेल्या वर्षी जिल्ह्यातून ८७४ कोटी रुपयांची निर्यात झाली असून अमरावती विभागात जिल्हा प्रथम व राज्यात चौथा क्रमांकावर आला आहे. चालू वर्षात १५०० कोटींचे उद्दिष्ट असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. युवकांना संबोधित करतांना जिल्हाधिकारी म्हणाले की, आजचा काळ हा तुमच्यासाठी सुवर्णसंधी घेऊन आला आहे. स्किल इंडिया, स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया, ॲग्री-स्टार्टअप्स, ई-कॉमर्स आणि सेवा क्षेत्रात अपार संधी उपलब्ध आहेत. यातून आजचा युवक नोकरी शोधणारा नाही, तर नोकरी देणारा बनू शकतो. त्यामुळे या संधीचं सोनं करा, कारण तुमच्या कामातून, कौशल्यातून आणि प्रामाणिक प्रयत्नातूनच जिल्ह्याचा आणि देशाचा विकास शक्य आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डिजिटल क्रांतीच्या दिशेने पाऊल टाकत जिल्हा प्रशासनामार्फत ङ्गमहसूल मित्र- सुलभ व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवाफ सुरू करण्यात आली असून सेवा हक्क, सहज प्रणाली, प्रतिसाद प्रणाली अशा विविध सेवा नागरिकांना सुलभपणे उपलब्ध केल्या आहेत. यासह भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांच्या व्यवस्थापनासाठी प्रशासनाने ङ्गपुनर्भू- भूसंपादन प्रणालीफविकसित केली असून याद्वारे संपूर्ण



माहिती ऑनलाईन उपलब्ध केली आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले. बुलढाणा पोलिसांनी ङ्गमिशन परिवर्तनफ अंतर्गत गुन्हेगारीत १० टक्के घट व ८० टक्के गुन्ह्यांची उकल केली आहे. तसेच गुन्हेगारांवर वचक राहावा म्हणून जिल्हा पोलीस दलाकडून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ या नवीन कायद्यातील विविध कलमांन्वये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाची जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी प्रशंसा केली. यासोबतच, जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान सारखे विविध उपक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविले जात आहेत. तसेच आरोग्य विभागामार्फत नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम आणि जनजागृती कार्यक्रम प्रभावी ठरत असल्याचे ते म्हणाले. २०४७ पर्यंत, स्वातंत्र्याच्या शताब्दी काळात, भारत एक विकसित राष्ट्र बनेल आणि त्या विकासगाथेत बुलढाणा जिल्ह्याचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले जाईल, असा संकल्प करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. मुख्य ध्वजारोहणानंतर जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी पोलीस दलाची परेड पाहणी करुन मानवंदना दिली. त्यानंतर पथसंचलनात पोलीस, वन, महिला व बालविकास, शिक्षण विभागाच्या ९ शाळेतील १८०० विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायतीचे सादरीकरण केले. यासह अंमली पदार्थ प्रतिबंधात्मक जनजागृतीच्या उद्देशाने पोलीस विभागामार्फत पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रशासन, पोलीस, जिल्हा परिषद, जिल्हा सैनिक कल्याण, जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा पशुसंवर्धन विभाग, नगरपरिषद बुलढाणा, नैसर्गिक आपत्ती विभागातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून गौरव करण्यात आला.




# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांचा गौरव

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, कार्यक्रम तसेच जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमांच्या प्रसार-प्रसिद्धीत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन लक्ष्मण राठोड यांचा प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा प्रशासनाच्या विविध उपक्रमांची प्रसार-प्रसिद्धी करून नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आणि माध्यमांच्या समन्वयाने शासनाच्या धोरणांचा सकारात्मक संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली त्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांच्या



हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी आमदार संजय गायकवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८